# डॉ. व्ही. टी. पाटील फाऊंडेशन, कोल्हापूर या सामाजिक संस्थेच्या कार्याचा आढावा (२०२०-२०२४)

**कु. राजश्री शंकर जगताप** पीएच.डी. संशोधन विध्यार्थिनी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
E-mail ID: rsjagtap1993@gmail.com

---

भारतातील महिलांचे आर्थिक सबलीकरण ही सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. अनेक महिलांना कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची संधी मिळत नाही. पण कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांना व्यवसाय आणि उद्योजकतेच्या माध्यमातून सक्षम करण्याचे काम कांचन परुळेकर यांनी केले. त्यांनी स्वयंसिध्दा संस्थेच्या माध्यमातून अनेक महिलांना प्रशिक्षित करून त्या महिलांनी बनवलेल्या वस्तूला बाजारपेठेही उपलब्ध करून दिली. त्याचबरोबर ग्रामीण भागातील महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना पद, प्रतिष्ठा, पैसा मिळवून देण्यासाठी त्यांनी डॉ. व्ही. टी. पाटील फाऊंडेशनची स्थापना केली.

***डॉ. व्ही. टी. पाटील फाऊंडेशनची स्थापना व उद्देश :**

संघटन, सहकार्य, सद्भाव या त्रिसूत्रीच्या आधारे ग्रामीण जनतेला स्वावलंबी बनवण्यासाठी १३ एप्रिल १९९४ ला कांचन यांनी कोल्हापूरमध्ये डॉ. व्ही.टी. पाटील फाऊंडेशनची स्थापना केली. संस्थेचा उद्देश म्हणजे ग्रामीण स्त्री-पुरुषांना स्वावलंबी बनवण्यासाठी अनौपचारिक शिक्षण देणे, मनुष्यबळाचा सर्वांगीण विकास, महिला सबलीकरण, विकासोन्मुख अशी ग्रामीण पुनर्रचना करणे, शेतकऱ्यांना पत, प्रतिष्ठा आणि पैसा प्राप्त करून देणे. यासाठी संस्थेमार्फत विविध मार्गांचा अवलंब करण्यात आला. संस्थेमार्फत २०२० ते २०२४ पर्यंत केलेल्या कार्याचा आढावा खालील प्रमाणे आहे.

१.शिबिरे, कार्यशाळा, प्रशिक्षणे : ग्रामीण भागातील महिलांना प्रशिक्षित करण्यासाठी संस्थेमार्फत शिबिरे, कार्यशाळा, प्रशिक्षणे, आयोजित केली जातात. या प्रशिक्षणाद्वारे महिलांना गांडूळ खत तयार करणे, पोषण बाग, भात शेती, रोपवाटिका तयार करणे, कुक्कुटपालन याबाबत मार्गदर्शन केले जाते. वन विभागाच्या लाभार्थ्यांसाठी राजापूर, राधानगरी येथे उद्योजकता विकास शिबिरे, ड्राय स्नॅक, पेपर बॅग निर्मिती प्रशिक्षण दिली. महिलांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी करनुर येथे संस्थेच्या महिलांना व्यक्तिमत्व विकास, नेतृत्व विकास, बाजारपेठ मिळणे यासाठी मार्गदर्शन करणारी शिबिर आयोजित करण्यात आली. स्वयंनिर्भरता संकुल, करनूर येथे निवासी कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यामध्ये महिलांना अळिंबी उत्पादन, रोपवाटिका, गोंडे, पेंटिंग वर्कशॉप, रांगोळी ही मागणीनुसार प्रशिक्षणे देण्यात आली. दरमहा शालेय विद्यार्थ्यांसाठी हसत खेळत हस्तकला, व्यक्तिमत्व विकास, नृत्य प्रशिक्षण देण्यात येते.

२.ग्रामीण प्रकल्प : संस्थेमार्फत २०२० मध्ये 'विषमुक्त पोषण बाग' या प्रकल्पावर भर देण्यात आला. बुजवडे, सरवडे, चोरवाडी, मल्लेवाडी, परळे निनाई, करनूर, तळवडे येथे पोषण बागेचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये रासायनिक खताचा वापर न करता सेंद्रिय खतावर कशा प्रकारे आपण भाजी पिकवू शकतो याचे प्रशिक्षण देण्यात आले. कोरोनाच्या काळात या प्रकल्पामुळे महिलांनी घरगुती वापरानंतर उरलेल्या भाजी विक्रीतून दोन हजार रुपये पर्यंत मासिक उत्पन्न मिळवले. पारंपरिक शेतीमधून शेतकऱ्यांना जास्त फायदा होत नाही. त्यामुळे शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करण्यासाठी संस्था कायम प्रयत्नशील आहे. संस्थेमार्फत ग्रामीण भागात सुधारित बियाणे वाटप केले जाते. बदलत्या काळानुसार शेतीत बदल करणे गरजेचे आहे, यासाठी पारंपारिक शेतीच्या जागी शाश्वत शेती वर प्रशिक्षणे आयोजित केली जातात. शेतीला जोडधंदा म्हणून कुकूटपालन, ससेपालन, पर्यटन पूरक उद्योग यावर मार्गदर्शन दिले जाते.

३.आपत्तीग्रस्त सहाय्य : कोरोना आपत्तीमुळे ज्यांचे उत्पन्न थांबले, त्यांना संस्थेने ५३,५०० रुपयांचे सहाय्य केले.

४.हा छंद निर्मितीचा : संस्थेच्या माजी अध्यक्षा कै. डॉ. सरोजिनी शिरगोपीकर यांचा स्मृतिदिन हा छंद निर्मितीचा म्हणून साजरा केला जातो. यामध्ये महिलांना वेगवेगळ्या कलांचे प्रशिक्षण दिले जाते, आणि छंद जोपासण्यासाठी प्रेरित केले जाते. यामुळे त्यांच्यामध्ये असणाऱ्या सुप्त गुणांना वाव मिळतो. त्यांच्या छंदातून निर्माण वस्तूचे प्रदर्शन भरवण्यात येते, स्पर्धा घेतली जाते. पण कोरोनामुळे २०२० ते २०२१ या काळात स्पर्धा, प्रदर्शनी भरवली नाहीत. पण शिवाजी पार्क सेवावस्तीतील मुलींना पेपर बॅग प्रशिक्षण, कमवा शिका चा संदेश, नोव्हेंबर २०२१ ला श्रुती दांडेकर यांच्या गोधडी मेकिंग लोकल टू ग्लोबल सेमिनारचे आयोजन करण्यात आले.

५.डॉ. शोभना तावडे मेहता आरोग्यम् धनसंपदा प्रकल्प : या अंतर्गत ग्रामीण भागातील स्त्रियांचे आरोग्य तपासणी करण्यासाठी नियमित कॅम्प घेण्यात येतात. कोरोना कालखंडामध्ये वर्षभरात २०२० ला १३ कॅम्प घेऊन ४७४ वाड्यावस्तीवरील लोकांना आणि 2021 ला २० कॅम्प घेऊन ५८६ लोकांना आरोग्य सेवा पुरवण्यात आली. कोरोनानंतर

स्वयंसिद्धा मध्ये दर बुधवारी ॲलोपथी, आयुर्वेद, फिजिओथेरपी कॅम्प घेतले जातात. त्याचबरोबर कोल्हापूर मधील हमाल, भाजीवाले, रिक्षाचालक यांच्यासाठीही आरोग्य कॅम्प आयोजित केले जातात.

६.जननी आरोग्य जागृती : महिला आपल्या आरोग्याकडे नेहमी दुर्लक्ष करतात. त्यामुळे सौ. रोहिणी डांगे, गोवा यांच्या देणगीतून कै. उर्मिला जाधव यांच्या स्मरणार्थ हा प्रकल्प साकारण्यात आला. याअंतर्गत २०२१ ला भाजी विक्रेत्या महिलांसाठी आरोग्य कॅम्प, पॅरालिसीस झालेल्या महिलेला अर्थसहाय्य करण्यात आले. २०२२ ला संस्थेच्या महिलांची हिमोग्लोबिन व कॅल्शियम रक्तपातळी तपासून औषधोपचार करण्यात आले. मल्लेवाडी, बुजवडे, तरसंबळे, चोरवाडी सारख्या ग्रामीण भागात २०२३ ला मासिक पाळी ते पाळी जाण्यापर्यंतचा प्रवास, लैंगिक आरोग्याबाबत माहिती देण्यात आली. आजही महिला मासिक पाळीच्या काळात स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात. संस्थेमार्फत मुली, महिलांना सॅनिटरी नॅपकिन वाटून पाळीच्या वेळची स्वच्छता, दक्षता याबाबत मार्गदर्शन केले जाते. संस्थेने बचतगटातील महिलांनी आपल्या दरमहाच्या बैठकीतील वीस मिनिटे महिलांच्या लैंगिक आरोग्यावर चर्चा करण्यात घालवावी याबाबत संस्थेने बचतगटांना मार्गदर्शन केले व यासाठी आवश्यक असणारे प्रयोग काही ठिकाणी केले.

७.माणिकमोती प्रकल्प : डॉ. किरण व नंदिनी जोग यांच्या देणगीतून कै. माणिकताई जामसांडेकर यांच्या स्मरणार्थ हा प्रकल्प सुरू करण्यात आला. या प्रकल्पाअंतर्गत दरवर्षी ज्या महिलेला, मुलींना, संस्थेला आर्थिक मदतीची गरज असते, या निधीतून त्यांना आर्थिक सहाय्य केले जाते.

८.प्रदर्शने : महिलांना प्रशिक्षण देऊन जेव्हा उत्पादन करण्यास शिकवले जाते, तेव्हा त्या उत्पादनातून निर्माण झालेल्या वस्तूला बाजारपेठ मिळवून देणे ही आवश्यक असते. संस्थेमार्फत महिलांच्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी स्वयंनिर्भरता संकुल, टाकळा येथील हॉलवर छोटी प्रदर्शने भरवण्यात येतात. येथे स्वेटर महोत्सव, संक्रांत वाण, मसाला महोत्सव, वाळवण्याचे पदार्थ, गणपती सजावट वस्तू इ. प्रकारची प्रदर्शने भरवली जातात.

डॉ. व्ही. टी. पाटील फाउंडेशन हे ग्रामीण पुरुष आणि स्त्री यांच्यासाठी विविध प्रकल्प राबवते. संस्थेच्या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील पुरुष आणि महिलांना शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध होत आहेत. वाड्यावस्त्यावर जावून संघटना बळकट करणे, मनुष्य विकास, कमावते साधन, शेती तंत्र, आरोग्य रक्षण, शाळांचा दर्जा सुधारणे आणि शेतकऱ्याना पद, प्रतिष्ठा, आणि पैसा मिळवून देण्यासाठी संस्था प्रयत्न करते. सामुदायिक शेती आणि कंत्राटी शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे आर्थिक सशक्तिकरण होत आहे. शेतातील वस्तू विक्री योग्य कशी बनेल, त्यासाठी प्रक्रिया उद्योगाचे महत्त्व सांगण्यासाठी संस्थेमार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या दृष्टीने संस्थेचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे.

**संदर्भ** :

१. डॉ. व्ही. टी. पाटील फाउंडेशन, वार्षिक अहवाल, २०२०
२. डॉ. व्ही. टी. पाटील फाउंडेशन, वार्षिक अहवाल, २०२१
३. डॉ. व्ही. टी. पाटील फाउंडेशन, वार्षिक अहवाल, २०२२
४. डॉ. व्ही. टी. पाटील फाउंडेशन, वार्षिक अहवाल, २०२३
५. डॉ. व्ही. टी. पाटील फाउंडेशन, वार्षिक अहवाल, २०२४
६. *https://youtu.be/4ELrWOI47IA?si=IhECn5uNGAIrsTxy*
७. *https://youtu.be/k4Wmxe0BvHE?si=WezqglvclKUfz7i8*